महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,
दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

जा.क्र.शापसे/भांडार/२०२५/ लेखा शाखा -३ |822
दिनांक :- 29|05|2025

वाचा :- यापूर्वी प्रसिध्द केलेले दिनांक १३/०२/२०२५ रोजीची निविदा/दरपत्रक तांत्रीक कारणास्तव रद्द करण्यात येत असून आता खालील प्रमाणे नव्याने निविदा /दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या वाहनांची दुरूस्ती व देखभाल, शासकीय परिवहन सेवेच्या कार्यशाळेत करण्यात येते. वाहनांच्या दूरूस्तीनंतर वाहनाचे बदललेले सूटे भाग, वापरलेले ऑईल, वापरलेल्या बॅटरी, वापरलेली टायर्सची विक्री करण्यासाठी मोहोरबंद दरपत्रक मागवित आहोत. तरी, इच्छूक खरेदीदारकांनी दरपत्रकातील अटी व शर्ती विचारात घेऊन दरपत्रके सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन दरपत्रक बंद लिफाफ्यात शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे दि. २९/०५/२०२५ ते दि.०६/०६/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत दोन लिफाफा पध्दतीने जमा करावेत. त्यानंतर आलेली दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

१. प्राप्त दरपत्रके नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांनी दिलेल्या तारखेस व वेळेला नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या दालनात उघडण्यात येतील. खरेदीदारांना दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ पत्राद्वारे /फोनद्वारे कळविण्यात येईल. दरपत्रकाचे मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी खरेदीदार स्वतः किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

२. वाहनाचे बदलेले सूटे भाग, वापरलेले ऑईल, वापरलेल्या बॅटरी, वापरलेली टायर्सची विक्री करण्यासाठी दरपत्रकाबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

३. दरपत्रक सूचनेसोबत जोडलेल्या यादीनुसार विभागातील वाहनाचे बदलेले सूटे भाग, वापरलेले ऑईल, वापरलेल्या बॅटरी, वापरलेली टायर्स इ. जास्त दर देणा-या खरेदीदारास जेथे आहे व जसे आहे तसे विक्री करणे आहे.

४. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांनी दरपत्रकातील सूचनेसोबत जोडलेल्या निविदा फॉर्ममधील विवरणपत्रात दर नमूद करुन दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने बंद लिफाफ्यात

CamScanner

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे दि. २९/०५/२०२५ ते दि.०६/०६/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेल्या दरपत्रक/निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

५. निविदाकार यांना साहित्याची प्रत्यक्ष पाहणी करावयाची आसल्यास त्यांनी दिनांक ०२/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते ०४.३० या कालावधीत कार्यालयात पहाणी करता येईल.

६. अनामत रक्कम रुपये ५००/- (ना परतावा) नियंत्रक, रोख शाखा, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडे जमा करावी. व निविदा दरपत्रक फॉर्म घेण्यात यावा. कार्यालयातून घेतलेल्या निविदा दरपत्रक फॉर्मच ग्राह्य धरण्यात येईल.

७. सदर विक्री ही दरपत्रक पध्दतीने करण्यात येणार असल्याने वंद लिफाप्यावर" वाहनाचे बदलेले सूटे भाग, वापरलेले ऑईल, वापरलेल्या बॅटरी, वापरलेली टायर्स खरेदीसाठी दरपत्रक असे स्पष्ट नमुद करावे तसेच लिफाफ्यावर दरपत्रक सादर करणा-याचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक नमूद करुन दरपत्रक सादर करावी.

८. * सदर दरपत्रकासोबत खरेदीदाराने तांत्रिक लिफाफ्या मधे खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१) आधार कार्ड

२) पॅन कार्ड

३) आस्थापना दुकान परवाना / उद्योग आधार.

४) वस्तू व सेवाकर प्रमाणपत्र (GST).

५) महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड प्रमाणपत्र.

९. * सदर दरपत्रकासोबत खरेदीदाराने वित्तीय लिफाफ्या मधे दर नमूद करणे.

१०. अनामत रक्कम भरल्यानंतर नियंत्रक, रोख शाखा, शासकीय परिवहन सेवा, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०३० यांच्याकडून प्राप्त झालेली पावती तांत्रिक लिफाफ्या सोबत जोडणे आवश्यक आहे, अनामन रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.

११. दरपत्रक उघडण्याच्या विहित वेळेस संबंधित खरेदीधारकास/प्रतिनिधीस व्यक्तीशः उपस्थित रहाता येईल, तसेच उपस्थिती नसल्यास सदर दरपत्रक उपस्थित खरेदीकार/प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील व त्याबाबत अनुउपस्थित दरपत्रकधारकाची कोणतीही तक्रार चालणार नाही.

CamScanner

१२. यशस्वी खरेदीधारकास मंजूर निविदा रक्कमेतुन अनामत रक्कम वजा जाता, उर्वरित रक्कम कार्यालयीन पाच दिवसात भरणा करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील, अन्यथा त्याची दरपत्रक रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

१३. यशस्वी खरेदीदाराने दरपत्रक स्विकृतीनंतर रक्कमेचा भरणा करून तात्काळ सदर वस्तु आहे त्या ठिकाणाहुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच दरपत्रक मंजूरी नंतर सदर वस्तुची जबाबदारी खरेदीदाराची राहील,

१४. सदर वस्तु वाहतुक करताना/ताब्यात घेताना आवश्क असलेले शुल्क / कराचा भरणा, अनुषंगीक खर्चाची संपूर्ण जबाबदारी यशस्वी खरेदीदाराची राहील.

१५. यशस्वी खरेदीदाराने दरपत्रक मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

१६. दरपत्रकाबाबत खरेदीधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

१७. कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर नाकारणे याचे संपुर्ण अधिकार नियंत्रक शासकीय परिवहन सेवा यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१८. यशस्वी खरेदीधारकाने वस्तु ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

१९. खरेदी करण्यात आलेल्या साहित्याचा धनादेश ACCOUNT OFFICER GOVERNMENT TRANSPORT SERVICE WORLI MUMBAI या नावे देण्यात यावा.

२०. साहित्य घेवून गेल्यांनतर साहित्य ज्या जागेवरून घेवून गेले आहेत त्या जागेची स्वच्छता करणे बंधनकारक आहे.

(रमेश सरफरे)
कार्यालयीन अधिक्षक,
शासकीय परिवहन सेवा,मुंबई

CamScanner

विक्री करावयाच्या साहित्याची यादी

| अनु क्र. | लिलाव साहित्य | कि.ग्रा../ लि./नग |
|---|---|---|
| १ | वाहनांचे वापरलेले सुटे भाग | ९५० प्रति कि.ग्रा |
| २ | वाहनांची वापरलेले बॅटरी | २७ नग |
| ३ | वाहनांचे वापरलेले ऑईल | ८८६ लिटर |
| ४ | मर्सिडिस चे वापरलेले टायर्स | ८ नग |
| ५ | वाहनांचे वापरलेले टायर्स | १६१ नग |

( विक्री करावयाच्या साहित्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. )

CS CamScanner

निविदा फॉम

दिनांक :-

प्रति,
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,
मुंबई- ४०० ०३०

विषय :- वाहनाचे बदलेले सूटे भाग, वापरलेले ऑईल, वापरलेल्या बॅटरी, वापरलेली टायर्सची इ.साहित्याच्या खरेदीबाबत....

महोदय,

आपली निविदा सुचना क्र.शापसे/भांडार/२०२५/ लेखा शाखा -३ च्या संदर्भात शासनाच्या संकेतस्थाळावर दिलेल्या दि. २९/०६/२०२५ च्या जाहिराती अनुसार आहे. त्या स्थितीत मी लिलिवामध्ये भाग घेजू इच्छितो आहे. या प्रक्रियेकरिता निविदा सूचनेमध्ये लागू सर्व नियम, अटी व शर्ती मला मान्य् आहेत.

निविदा दर पत्रक

| अनु क्र. | साहित्य | कि.ग्रा./ लि./नग | किंमत ( रूपये ) |
|---|---|---|---|
| १ | वाहनांचे वापरलेले सुटे भाग | ९५० प्रति कि.ग्रा | |
| २ | वाहनांची वापरलेले बॅटरी | २७ नग | |
| ३ | वाहनांचे वापरलेले ऑईल | ८८६ लिटर | |
| ४ | मर्सिडिस चे वापरलेले टायर्स | ८ नग | |
| ५ | वाहनांचे वापरलेले टायर्स | १६१ नग | |

दरपत्रक सादर करणा-याचे नाव :-

पत्ता :-

स्वाक्षरी :-

दुरध्वनी क्र. :-

CamScanner